दिनांक :– ११.११.२०२१.

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक मारोती खुशालराव नंदे, वय ३५ वर्ष, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन गोरेगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली रा.चोंढी, ता.मुखेड, जि.नांदेड यांनी लाचेची मागणी केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.०२.११.२०२१ रोजी तक्रार दिली की, ''आरोपी लोकसेवक हे तक्रारदार यांना दिवाळी निमीत्त एक महिना क्लब चालु देण्यासाठी व त्यावर कार्यवाही न करण्यासाठी यातील लोकसवेक यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/– रू लाचेची मागणी करित आहेत.''

तरी सदर तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली कार्यालयाचे वतीने दिनांक ०२.११.२०२१ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक मारोती खुशालराव नंदे, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन गोरेगाव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे उपरोक्त कामासाठी १०.०००/– रू लाचेची मागणी करून पडताळणी कार्यवाही दरम्यान त्यापैकी ३०००/– रू लाच स्वीकारले व उर्वरीत ७०००/– रू लाचेची रक्कम स्वीकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले.

तक्रारदार यांना लाचेची मागणी करून त्यापैकी ३०००/– रू स्वीकारून उर्वरीत ७०००/– रू लाच स्वीकारण्यास सहमती दिली म्हणुन भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री निलेश सुरडकर यांनी पोह श्री विजयकुमार उपरे, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलींगे, श्री महारूद्र कबाडे, श्री तानाजी मुंढे, श्री अविनाश किर्तनकार, श्री चालक पोना श्री हिम्मतराव सरनाईक यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**१) टोल फ्री क.१०६४,**
२) कार्यालयाचा दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
३) श्री निलेश सुरडकर, पोलीस उपअधीक्षक लाप्रवि हिंगोली यांचा मोबाईल क्रमांक ९८२२२००९५९